# संपादकीय

त्रैमासिक प्रकाशनाच्या प्रवासातील जून महिन्याचा अंक देताना मनस्वी आनंद होतोय. वस्तुतः संशोधन क्षेत्रातील जर्नल चे नियमित प्रकाशन हे सध्याच्या वातावरणात तरी जिकरीचे ठरले आहे अंक प्रकाशित होतोय यात लेखनकर्ते, वाचक यांचे सहकार्य लाभल्यामुळे अन्यथा ते शक्य झाले नसते.

अंक प्रकाशनाच्या बाबतीत सध्याच्या स्थितीचा मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर भारताच्या सर्वदूर भागात कोव्हिडच्या दुसऱ्या लाटेने अक्षरश थैमान घातले होते. तो कालखंड मार्चचा अंतिम आठवडा ते मे चा दूसरा आठवडा असा होता. त्या काळात प्रत्येकाचा कोणीतरी परिचित एक तर रुग्णालयात भरती होता किंवा रुग्णालयाच्या बेड करिता झुंज देत होता. त्यात औषधींचा तुटवडा त्यावरून होणारी हातापाई आपण अनुभवली. त्यातील दुःखाची किनार म्हणजे परिचितांपैकी जवळचा वा कोणी तरी आप्त आपण गमावला. या काळात फोन, मेसेज येणे ही उरात धडकी भरविणारी होते. यात प्राध्यापक संशोधक विद्यार्थी सर्वच होरपळल्या गेलेत भरीस भर म्हणजे तौक्ते वादळाने अक्षरशः समाज जीवन उद्ध्वस्त केले. आरोग्य आणि निसर्गाचा प्रकोप यामध्ये पिचल्या गेलेल्या वातावरणात लेखन करणे, मांडणी करणे जवळपास अशक्यप्राय बाब ठरलेली होती. परंतु सामान्यस्थितीत परतण्याकरिता आपण सर्वांनी संशोधन लेखनाच्या माध्यमातून केलेला प्रयास उर्जितावस्था प्रदान करणारा आहे.

अंक प्रकाशना सोबतच या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे समकालीन समस्यांवर संशोधनात्मक केलेले लिखाण होय. तौक्ते चक्रीवादळाने कोकण किनारपट्टीला जो आघात पोचवला त्याचे विपरीत परिणाम व्यवसायावर नेमके काय झाले त्याची वस्तुनिष्ठ व निरीक्षणात्मक केलेली मांडणी संशोधनाचे महत्त्व विशद करणारी आहे .साधारणतः संशोधक व समाज यांचा सहेतुक संबंध नाही असा आक्षेप घेतला जातो, त्याला अशा लिखाणामुळे उत्तर मिळताना दिसते. वृत्तपत्रात उमटणारा 'ग्राउंड रिपोर्ट' नावाचा एक प्रकार दिसतो. त्याप्रमाणे संशोधनात समकालीन प्रश्नांचा वेध घेतलेली मांडणी मोडते. तौक्ते वादळाप्रमाणेच कोव्हिड ने असंघटित क्षेत्रावर घाला घातल्याने अर्थचक्र तर बाधित झालेच परंतु अर्थव्यवस्थेचा एक भाग जायबंदी झाला यावरील मांडणी 'आत्मनिर्भर भारताला' आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारी आहे. वेगळ्या मांडणीतील भारताचे पूर्व आशिया धोरण यात 'बिमस्टेक' संकल्पना अंतर्भूत आहे, त्याचा वर्तमान संदर्भात घेतलेला आढावा परराष्ट्रीय क्षेत्रात संशोधन करू इच्छिणाऱ्यास मार्गदर्शक असा आहे."Patwari Policing in Uttarakhand A Study of Continuty & Change" पर्यावरण, स्थानिक प्रशासन तेथील लागेबांधे त्यातील अर्थकारण यावर प्रकाश टाकणारा विशेषतः चिपको आंदोलना च्या पार्श्वभूमीचा संदर्भ देत पर्यावरणाच्या बाबतीत मूलभूत प्रश्न उपस्थित करणारा हा लेख त्या अर्थाने महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण मर्यादा 50% वर उल्लंघता येणार नाही या दृष्टीने दिलेला निर्णय त्याचे पडसाद व घटनात्मक तरतुदी याविषयीची विस्तृत मांडणी करीत संशोधनाला नवे संदर्भ आरक्षण व भारतीय संविधान या लेखाने पुरविले आहेत आरक्षित मांडणी करू इच्छिणाऱ्यांनी या लेखाचा संदर्भ म्हणून वापर करायला हवा. ह्या अंकात अनुसूचित जमाती, महात्मा बसवेश्वर, संत कबीर तुलसीदास यांच्यावरील संशोधन लेख साहित्यकृतीच्या अंगाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. संसदीय कामकाजातील डॉ.जनार्दन वाघमारे यांचे कार्य अभ्यासकाने तपासून केलेली मांडणी संशोधन अंकाचे मूल्य विस्तारण्यात महत्त्वाची ठरले आहे. गिरीश कर्णाडच्या साहित्यातील परस्पर भिन्नता, क्रीडा क्षेत्रात उत्तम आरोग्याची अनिवार्यता, भारतातील रोजगाराचा आकृतीबंध, स्त्री-पुरुषातील संवाद रचना याबाबत संशोधन लेखातून केलेली मांडणी अध्ययन आणि समिक्षणाच्या संदर्भात अनन्यसाधारण आहे. आपल्या मौलिक योगदान यामुळे अंकाच्या प्रकाशनाचा मेरू पर्वत उचलणे शक्य झाले. आपले मनस्वी धन्यवाद.

संदीप तुंडूरवार
सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर